“ श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याचा विवेचक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी विषयातील पीएच.डी.

(विद्या वाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाची प्राथमिक रूपरेखा

संशोधक

कोमल बालाजी भरणे

एम.ए. (मराठी),एम.एड.,नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ. मारोती बालासाहेब भोसले

मराठी विभागप्रमुख

स्वा. सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय,

पूर्णा.जि.परभणी

१) प्रस्तावना :-

साहित्यात मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते. साहित्य आणि समाज यांचे अनुबंध अतुट आहेत. शतकानुशतकापासून मराठी साहित्याला समृध्द परंपरा लाभलेली आहे. साहित्याचे स्थूल मानाने ललित साहित्य आणि ललित्तेतर साहित्य अशा दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ललित साहित्य म्हणजे लालित्यपूर्ण व सौंदर्यपूर्ण लेखन होय. त्यामध्ये कथा,कविता,कादंबरी, नाटक,ललितगदय,ललितलेख इत्यादी ललित साहित्य प्रकाराचा समावेश होतो. मराठी साहित्य क्षेत्रात विविध प्रवाह आहेत. ग्रामीण साहित्य,दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, विद्रोही साहित्य, महानगरीय साहित्य, इत्यादी. साहित्यिकांनी मराठी साहित्य क्षेत्रच नव्हे तर मराठी भाषेलाही समृध्द व संपन्न बनविले आहे. नव्वद नंतरच्या काळात जे महत्वाचे मराठी साहित्यिक उदयास आले, त्यात श्रीकांत देशमुख यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांच्या साहित्य लेखनाने मराठी साहित्य क्षेत्रात मोलाची भर पडलेली आहे.

श्रीकांत देशमुख यांनी ग्रामीण साहित्य प्रवाहातून लेखन केले आहे. त्यांनी खेडयातील शेतात राबणा-या बळीराजाचे दु:ख साहित्यातून प्रकट केले आहे. शेतक-याला सत्तेच्या राजकारणातून निर्माण होणारे प्रश्न, शेतीचे प्रश्न आणि नव्या पिढीचे शैक्षणिक प्रश्न नव्या पध्दतीने साहित्यातून मांडले आहेत. त्यांनी समाजव्यवस्थेचे वास्तव चित्रण केलेले आहे. श्रीकांत देशमुख यांचे लेखन ग्रामीण साहित्य असून मुख्यप्रवाहाशी जोडले आहे.

श्रीकांत देशमुख आत्मानुभवातून लेखन करणारे साहित्यिक आहेत. त्यांनी कविता, कादंबरी, ललितगदय, वैचारिक साहित्य आणि साहित्य संपादन इत्यादी साहित्याचे लेखन केले आहे. संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षि वि.रा.शिंदे आणि छत्रपती शाहु महाराज अशा थोर समाजसुधारकांच्या विचारांचा प्रभाव श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यात दिसतो. त्यांच्या कवितांचा विविध विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश आहे. त्यांच्या ललित साहित्यावर संशोधन झालेले नाही. आजच्या काळात श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याचा समाज व्यवस्थेच्या दृष्टीने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. म्हणून “श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याचा विवेचक अभ्यास ” हा विषय शोध प्रबंधासाठी अभ्यासणार आहे.

२) संशोधनाची उदिदष्टे :-

१) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्याचे स्वरूप अभ्यासणे.

२) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यातील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास करणे.

३) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्याचे वेगळेपण अभ्यासणे.

४) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यातील आशय व विषय शोधणे.

५) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यातील सामाजिक वास्तवाचा वेध घेणे.

६) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेचा शोध घेणे.

३) संशोधनाची गृहितके :-

१) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यात कृषिजनसमुह आहे.

२) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्याची भाषाशैली वैशिष्टयपूर्ण आहे.

३) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यातील व्यक्तीचित्रण लक्षवेधी आहे.

४) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यात संतांचे आणि थोर व्यक्तींच्या विचारांचा प्रभाव आहे.

५) श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यामध्ये सामाजिक वास्तविकतेचे चित्रण आढळते.

६) श्रीकांत देशमुख एक सामाजिक निष्ठा जपणारे साहित्यिक आहेत.

४) संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :-

श्रीकांत देशमुख एक कवी, कादंबरीकार आणि ललित लेखक आहेत. त्यांचे साहित्य सर्वच स्तरातील व्यक्तींना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या साहित्याची व्याप्ती पाहता त्यांनी 'बळिवंत','आषाढ माती','बोलावे ते आम्ही','लोळण फुगडी' इत्यादी कवितासंग्रहाचे लेखन केले आहे. कादंबरी लेखनात 'पिढीजात' आणि 'कोवळे वर्तमान' व ललित गदय 'पडझड वा-याच्या भिंती', 'साखर कारखानदारीतले दादा' वैचारीक साहित्यामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ, कुळवाडी भूषण शिवराय आणि संपादन साहित्यामध्ये महानोरांची कविता (समीक्षा संपादन), समकालीन साहित्य विचार, डॉ. नागनाथ कोतापल्ले गौरवग्रंथ, भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य: नव्या पिढीचे अर्धशतकोत्तर पुनरावलोकन अशा विपूल साहित्याची व्याप्ती आहे. प्रस्तुत संशोधनासाठी श्रीकांत देशमुख यांच्या कवितासंग्रह, कादंबरी आणि ललितगद्य या तीन ललित साहित्य प्रकारांचाच अभ्यास करण्यात येणार आहे. ही माझ्या संशोधनाची मर्यादा आहे.

५) संशोधन विषयाचे महत्व आणि निवड :-

भारत हा कृषिप्रधान देश आहे. संतांनी आणि थोर व्यक्तींनी खेड्याचे, शेतक-यांचे आणि शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. आज खेडयातील सर्वच लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटले आहे. परंतु आजची सध्याची स्थिती पाहता जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे शेतक-यांची नवीन पिढी शेतीपासून दुरावत आहे. विविध क्षेत्रात प्रगती झालेली आहे. परंतु शेती व्यवसायामध्ये विशेष प्रगती झाली नाही. विशेषत: मराठवाडयातील गरीब शेतकरी व शेतमजूर हा अडचणीत सापडलेला आहे.

मराठवाडयातील ग्रामीण भागातील शेतक-याची स्थिती पाहिली तर शेतीतील कोरडादुष्काळ, वाढती महागाई, पाणी प्रश्न, वीज, सरकारची बदलती धोरणे, शेतीवर आलेली अवेळी नैसर्गिक संकटे, प्रत्येक गरीब शेतक-याला शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही. वाढते कर्ज, वर्षानुवर्ष शेतक-याचे शोषण होत आहे. कोरडवाहू शेतक-यांच्या नवीन पिढीला शेती सोडून नौकरी करावी वाटत आहे. त्यांच्या उच्च शिक्षणासाठी आणि नौकरीसाठी शेतक-याला स्वत:ची शेती विकावी लागते. परिणामी शेती व्यवसाय आर्थीक संकटात सापडला आहे. त्यामुळे कृषिप्रधान देशात आजही शेतक-यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. अशा गरीब व शोषित शेतक-यांच्या मुक्या भावनांना बोलते करण्याचे कार्य श्रीकांत देशमुख यांनी साहित्यातून केलेले आहे.

श्रीकांत देशमुख यांचे ललित साहित्य कृषिक्षेत्राशी निगडीत आहे. त्यांच्या साहित्यात शेती,माती,वृक्ष,पशु-पक्षी,माणूस या सर्वांविषयी प्रेम व जिव्हाळा आहे. शेतक-यांच्या आणि शिक्षित पिढीच्या दु:खी भावनांच्या वास्तवीक चिंतनातून श्रीकांत देशमुख यांनी लेखन केले आहे. त्यांच्या ललित साहित्याचा समाजातील कृषिजनसमुहालाच नव्हे तर सर्वच मराठी साहित्यिकांना शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना एक नवीन आशा आणि प्रेरणा देणारे आहे. म्हणूनच सामाजिक बांधिलकी जपणारे ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याची समीक्षा होणे गरजेचे आहे.

श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्यावर संशोधन झाले नाही. प्रस्तुत संशोधन विषय मराठी भाषेच्या अभ्यासकांच्या दृष्टिने खूप महत्वाचा आहे. तसेच सध्याच्या परिस्थितीमध्ये प्रस्तुत विषयावर संशोधन करणे आवश्यक आहे. म्हणून मी शोधप्रबंधासाठी "श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याचा विवेचक अभ्यास" हा विषय निवडला आहे.

६) संशोधन विषयाची साधनसामग्री :-

कोणतेही संशोधन करत असतांना त्या संशोधनासाठी माहिती संकलीत करावी लागते. माहिती संकलनासाठी संशोधन विषयाच्या साधन सामग्रीची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधन विषयाकरिता विषयाशी संबंधित साहित्य,मुळग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ, संबंधित विषयाचे लेख व संशोधन पेपर, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, वेबसाइट वरील माहिती, विषयाशी संबंधीत शोधप्रबंध इत्यादी साधन सामग्रीचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

७) संशोधन पध्दती :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करताना चरित्रात्मक, ऐतिहासिक संशोधन पध्दती, मानसशास्त्रीय, चिंतनात्मक, आस्वादात्मक, आकलनात्मक, सामाजिक संशोधन पध्दती, वर्णनात्मक संशोधन पध्दती, तर्क चिकित्सक पध्दती इत्यादी संशोधनासाठी आवश्यक वाटणा-या इतर संशोधन पध्दतींचा उपयोग करणार आहे.

८) संशोधन आराखडयाचे प्रारूप :-

“ श्रीकांत देशमुख यांच्या ललित साहित्याचा विवेचक अभ्यास ”

प्रकरण पहिले :- श्रीकांत देशमुख व्यक्ती आणि कर्तृत्व

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या लौकीक जीवनाचा व कर्तृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यांची जन्मभूमी, बालपण, शिक्षण, नौकरी, वैवाहिक जीवन, छंद, संस्कार, लेखन प्रेरणा, प्रभाव, वाङ्मयीन कार्य, महाराष्ट्रातील शहरांचा लाभलेला सहवास, सामाजिक कार्य, प्रवास, त्यांना मिळालेले पुरस्कार, शैक्षणिक कार्य, सद्यपरिस्थिती यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- श्रीकांत देशमुख यांचे कविता लेखन

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या काव्य लेखनाचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यांच्या ‘बळिवंत’ (१९९७), ‘आषाढ माती’ (२००३) ‘बोलावे ते आम्ही’ (२०१३) आणि ‘लोळण फुगडी’ (२०२०) कवितासंग्रहाचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे:- **श्रीकांत देशमुख यांचे कादंबरी लेखन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या ‘पिढीजात’ (२०१९) आणि ‘कोवळे वर्तमान’ (२०२१) कादंबरीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- **श्रीकांत देशमुख यांचे ललित गदय लेखन**

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या गद्य लेखनातील ‘पडझड वा-याच्या भिंती’ (२०१५) आणि ‘साखर कारखानदारीतले दादा’(२०१६)इत्यादी ललित गदय संग्रहांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे :- **श्रीकांत देशमुख यांच्या साहित्याचे लेखन विशेष**

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यातील लेखन विशेषांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे :- **निष्कर्ष व उपसंहार**

प्रकरण क्रमांक एक ते प्रकरण क्रमांक पाच मध्ये अभ्यासा अंती हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात मांडले जाणार आहेत.

९) अ) परिशिष्टे

१) आधारभूत ग्रंथसूची
२) लेखकाची मुलाखत आणि लेखकाचे छायाचित्रे

कविता संग्रह

१) 'बळिवंत' (१९९७)
२) 'आषाढ माती' (२००३)
३) 'बोलावे ते आम्ही' (२०१३)
४) 'लोळण फुगडी' (२०२०)

कादंबरी

१) 'पिढीजात' (२०१९)
२) 'कोवळे वर्तमान' (२०२१)

ललित गदय संग्रह

१) 'पडझड वा-याच्या भिंती' (२०१५)
२) 'साखर कारखानदारीतले दादा'(२०१६)

ब) संदर्भ ग्रंथसूची

१) देशमुख विश्वास (संपा.)	'झाडमाणूस' श्रीकांत देशमुख गौरवग्रंथ समिती, लातूर
२) शिंदे राजशेखर (संपा.)	'बळिवंत आम्ही' शब्दमल्हार प्रकाशन
३) शेलार, सुधाकर	'साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे' अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे
४) कोतापल्ले, नागनाथ	'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध' मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे दि. १९९३
५)शहाजिंदे, फ. म.	'शेतकरी' आंतरभारती प्रकाशन, औरंगाबाद
६) भोसले, डॉ.मारोती	'मराठी ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप' संगत प्रकाशन, नांदेड

७) शेख, यास्मिन	'मराठी लेखन मार्गदर्शिका' सुभदा सारस्वत प्रकाशन,पुणे.
८) राऊत रमेश (संपा.)	'साक्षात' श्रीकांत देशमुख विशेषांक साक्षात प्रकाशन,औरंगाबाद.
९)कोतापल्ले, नागनाथ	'मराठी कविता: आकलन आणि आस्वाद' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
१०) महात्मा फुले	'शेतक-यांचा आसूड'

इंटरनेटवरील समीक्षा लेख

पारंपारिक व्यामिश्र जटिलतेचे 'कोवळे वर्तमान' — संतोष घसिंग
http://m.facebook.com / story. php? Story-f bid = 1995396047279456 & id = 100004272396995

"कविताही प्रतिकांच्या भाषेत बोलणारी : श्रीकांत देशमुख"
मुलाखत — तुषार ओव्हाळ

http : // www. mahamtb . com / Encyc /2018 /1 /28/ Interview – of – poet – Shrikant Deshmukh – by – Tushar – ovhal . amp . html 28 Jan – 2018

टिप :- या व इतर महत्वाच्या साधन ग्रंथांचा वापर संशोधन अभ्यासासाठी केला जाणार आहे.

संशोधक
कोमल बालाजी भरणे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. मारोती बालासाहेब भोसले
मराठी विभागप्रमुख
स्वा.सैनिक सूर्यभानजी पवार
महाविद्यालय,पूर्णा.जि.परभणी